FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला. प्र. वि. मुंबई, प्रथम खबर क्र. 23/2019, वर्ष, दिनांक 6/07/2019
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम 1988, कलमे Sections 7 (अ)
(ii) अधिनियम Act (सुधारणा-2018), कलमे Sections
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार शनिवार, तारीख पासून 14/02/2019, वेळ, तारीख पर्यंत 14/02/2019, वेळ
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)

(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख 14/02/2019 वेळ
Information received at P.S. Date Time

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 31/2019, तारीख 06/07/2019, वेळ 17:20
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र.
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव नागोरी चहा हॉटेल, मढ पोलिस चौकीच्या बाजूला,
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण हरवा देवी मंदिर जवळ, शिवाजी नगर, मढ, मालाड (प), मुंबई.
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव, तालुका, जिल्हा, राज्य
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name श्री. आन्चल (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name मुजफ्फर खान

(c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age 51 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9323752227

(e) पारपत्र क्रमांक Passport No. दिल्याचा दिनांक Date of Issue दिल्याचे ठिकाण Place of Issue (f) व्यवसाय Occupation

(g) धर्म Religion, जात Caste, जनजात Sub-Caste

(h) पत्ता : Address : रुम नं. 1, रोड नं. - 3, शिवाजी नगर, बाप्तीस्ट चर्च जवळ, मढ, मालाड (प), मुंबई - 61
(Ward / House/Name No. / Phone/M. No. / Pan No. / Card No. / Road / Nearest identifiable place / Village / Post / P. Stn.)

तालुका Taluka, जिल्हा Distt., राज्य State, सध्याचा पत्ता Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

ओमराम भवरलाल माळी (पप्पु मारवाडी) रा. ठि. मामु - शाळी, शिवाजी नगर, मढ, मालाड (प), मुंबई. 61
(खाजगी इसम)

खरी नक्कल
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

फिर्यादी श्री. आचन मुजफर खान मु. 51 वर्षे,
धंदा - बांधकाम ठेकेदार, रा. ठि. रूम नंबर-1,
गेट नं. 03, शिवाजी नगर, मढ, मालाड (प)
मुंबई यांचा संगणकवर जबाब टंकलीखीत
केला असुन त्यास नमुद गुन्ह्याची प्रथम खबर
संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(स्वाक्षरी)

(विनोद स. पाटील)
पोलीस निरीक्षक
वा. प्र. वि. मुंबई.

आद्याक्षरीत
6-7-2019

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे फिर्यादी कडुन .
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.
—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य
Total Value of properties stolen / involved —

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक :
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपीस इसमाने फिर्यादी यांचे बांधकाम पी/नार्थ मनपा वार्ड, मालाड यांचेकडुन निष्कासीत करण्यात आले होते त्या बांधकामाचे पुन्हा बांधकाम करण्यासाठी नमुद मनपा विभागाचे मुकादम राठोड यांच्या करिता रु. 1 लाखाची लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य केले म्हणुन आरोपीता-विरुद्ध भ्रा. प्र. प्रतिबंध अधिनियम 1988 (सुधारणा-2018) चे कलम 7(अ) अन्वये गुन्हा नोंद आहे.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
पोलीस निरीक्षक विनोद पाटील

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ______, जिल्हा ______, राज्य ______,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................ Rank................ No. ............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ................................................ (3) Transferred to P.S ........................................,
District ............................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोवर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

अस्पष्ट दाव

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station [illegible]
संपूर्ण नाव Name ........ विनोद सर्जेराव पाटील
पदनाम Rank ........
तपासिक अं. चा कोड. पोलीस निरीक्षक
Posting ला. प्र. वि. मुंबई
Code No. of I.O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

खरी नक्कल
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

फिर्यादी जबाब दिनांक ०६/०७/२०१९

श्री. आचन मुजफर खान वय ५१ धंदा– व्यवसाय, बांधकाम ठेकेदार, रा.ठि. रूम नं.१,गेट ०३,शिवाजी नगर, बाप्तीस्टा चर्च जवळ, मढ, मालाड ( प) मुंबई ६१ मो.९३२३७५२२२७

मी वरील प्रमाणे असुन, वर दिलेल्या पत्यावर वर्षापासुन कुंटूबियासह रहावयास आहे. माझा व्यवसाय बांधकाम ठेकेदार असुन, सदरचा व्यवसाय हा मला ज्याप्रमाणे बांधकामाबाबत ऑर्डर मिळतात त्याप्रमाणे मी सदर ठिकाणी जावुन करतो. सदर व्यवसायातुन मिळणा–या रक्कमेवर माझा व कुटूबियाचा उदारनिर्वाह चालतो.

सन –२०१८ मध्ये मी राहत असलेल्या परिसरात ओळखीचे इसम नामे इंद्रजीत बबलु यांचे मालाड येथील शिवाजी नगर, बाप्तीस्टा चर्च जवळ असलेल्या बैठया चाळीतील घराचे दुरूस्तीचे काम महानगर पालीकेची परवानगी घेतलेली नसतांना घराचे काम पुर्ण केले त्यानंतर बी.एम.सी.पी/नॉर्थ कडुन सदरचे घराचे अनिधीकृतपणे केलेले बांधकाम निष्कासीत केले व त्यानंतर आमचे परिसरात राहणारे ओळखीचे इसम नामे श्री. भोमराम भवरलाल माली (पप्पु मारवाडी) यांनी येवुन मला सांगितले की, बी.एम.सी.पी/नॉर्थ वार्ड,मालाड (प) येथील मुकादम या हुददयावर कार्यरत असलेले लोकसेवक श्री.राठोड यांनी तोडलेले बांधकाम पुन्हा करावयाचे असेल तर रू. २,००,०००/–(दोन लाख रूपये )मागणी केली असुन सदरची रक्कम त्याचेकडे देण्यास सांगितले आहे. त्यांनतर मी नमुद वार्डात जावुन श्री राठोड यांना माझे मित्र डोंगरकर यांचेसह जावुन भेटलो असता नमुद वेळी त्यांनी माझेकडे रू.दोन लाखाची मागणी केली व नमुद रक्कम आमच्या विभागातील इसम नामे श्री पप्पु (खाजगी इसम) याचेकडे देण्यास सांगितले.

लोकसेवक श्री.राठोड/बी.एम.सी.पी/नॉर्थ वार्ड,मालाड (प) यांचेकरीता पप्पु नावाचा इसम हा रू. २,००,०००/– मागणी करीत होता. लोकसेवक राठोड यांनी पप्पु नावाच्या इसमाच्या वतीने मागणी केलेली दोन लाख रूपये लाचेची रक्कम मला देण्याची इच्छा नसल्याने दिनांक १४/०२/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुबई येथे तक्रार देण्यास गेलो असता त्यावेळी मी पो.नि पाटील यांना मला लिहीता व वाचता येत नाही. फक्त स्वाक्षरी करता येते. मी सांगण्याप्रमाणे पो.नि पाटील यांनी अर्ज हिंदीमध्ये टंकलेखीत केला व मला वाचुन दाखविला असता तो बरोबर असल्याचे सांगुन त्यावर माझी स्वाक्षरी केली.

दिनांक १४/०२/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे लेखी तक्रार दिल्यानंतर पोलीस निरीक्षक पाटील यांनी तात्काळ दोन पंचाना समक्ष बोलावून त्यांना मी दिलेला तक्रार अर्ज पंचाना वाचण्यास दिला व मी दिलेल्या तक्रार अर्जाबाबत खात्री झाल्यानंतर, तक्रार अर्जावर पोलीस निरीक्षक पाटील व दोन्ही पंचानी समक्ष स्वाक्षरी करुन तो दाखल करुन घेतला.

सदर तक्रार अर्जाच्या अनुषगाने लोकसेवक राठोड यांचेकरीता पप्पु नावाचा इसम हा खरोखरच लाचेची मागणी करीत आहे किंवा कसे याबाबत त्वरीत पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पो.नि.पाटील यांनी मला व पंचंना सांगुन, पडताळणी पथकास त्याप्रमाणे योग्य ती पुढील तयारी करण्यास सांगितले. पडताळणीची पुर्व तयारी झाल्यानंतर मी, पो.नि.पाटील, दोन पंच, असे पडताळणी पथकासह दोन शासकीय वाहनातुन लाप्रवि. मुंबई कार्यालयातुन मढ,मालाड ,मुंबई येथे रवाना झालो.

खरी नक्कल

पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

त्यानंतर मी व पो.नि पाटील तसेच पडताळणी पथक असे सफेद रंगाच्या टाटा सुमोने पोलीस वाहनातुन सरपोचखानावाला, रोड येथुन, बांद्रा,अधेरी मालाड (पुर्व) येथुन आक्सा ब्रिज ,मढ मालाड येथे आलो. त्यानंतर पो.नि.पाटील यांनी मला पंचासमक्ष पप्पु नावाच्या इसमास मोबाईल फोनवर सपर्क साधण्यास सांगितले असता, माझा मोबाईल क्र.९३२३७५२२२७ वरून पप्पु याचा मोबाईल क्र.९७६९६५७८११ वर संपर्क साधला असता, पप्पु याने मला तो राहत असलेल्या ठिकाणी नागोरी डेअरी,शिवाजी नगर,मढ येथे बालोवुन घेतले. म्हणुन पो.नि पाटील यांनी मला, पच व पथकास तेथे जावुन प्रत्यक्ष भेटुन पडताळणी करून त्यांनतर लाचेची मागणी केल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले. त्यानंतर पो.नि पाटील यांनी मला सांगितले की, पप्पु व माझेमध्ये झालेले प्रत्यक्ष भेटीचे सभांषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी.कार्ड मध्ये ध्वनीमुद्रित करण्यात येणार असल्याचे सांगुन माझे सफेद शर्टाच्या आतील बनियनला व्हाईस रेकार्डर लावला व मला पंच श्री.भुर्के यांचे सह नागोरी डेअरी,शिवाजी नगर,मढ येथे गेलो असता, पप्पु नावाचा इसम भेटला त्याने माझेकडे मुकादम राठोड यांना देण्याकरीता एक लाख देणार काय असे विचारले असता, मी त्यांना संध्याकाळ पर्यत नाही, परंतु शनिवारी देतो म्हणुन सांगितले. त्यांनी ते मान्य करून आमचे सभांषण संपल्यानंतर मी व पंच असे परत पोलीस वाहनाजवळ निघुन आलो व वरील घटना मी पो.नि.पाटील यांना सांगितली त्यांनी याबाबत व्हाईस रेकॉर्डर वाजवुन व पंचाना विचारुन खात्री केली श्री.भोमराम भवरलाल माली (पप्पु मारवाडी) यांने मुकादम राठोड यांचकरीता रू.१ लाख लाचेची मागणी केल्याची खात्री पटली. त्यांनतर पडताळणी पथकास पप्पु नावाचा इसम हा आता लाच स्विकारणार नाही असे समजुन आल्याने पो.नि पाटील यांनी पडताळणी कारवाई स्थगित केली.

तदनंतर पप्पु नांवाच्या इसमाने माझ्याकडे लाचेबाबत आजपावेतो कोणताही संपर्क केलेला नाही.व भविष्यात करणार नाही अशी खात्री पटली. तसेच पप्पु यांचे यांच्या सोबत माझी कोणत्याही प्रकारचे वैमनस्य नसुन त्याच्याबरोबर कोणताही प्रकारची आर्थीक देवान घेवान नाही.

तरी दिनांक १४/०२/२०१९ रोजी मी राहत असलेल्या परिसरात शिवाजी नगर, बाप्तीस्टा चर्च जवळ असलेल्या बैठया चाळीतील घराचे दुरूस्तीचे पुर्ण केलेलें काम बी.एम.सी.पी/नॉर्थ कडुन तोडुन नुकसान केले व त्यानंतर पुन्हा बांधकाम करावयाचे असेल बी.एम.सी.पी/नॉर्थ वार्ड,मालाड (प) येथील मुकादम या हुददयावर असलेले लोकसेवक श्री.राठोड यांचेकरीता रू. १,००,०००/–ची माझे ओळखीचे पप्पु नावाच्या इसमाने मागणी केली. सदरची रक्कम मला देण्याची इच्छा नसल्याने त्यांचे विरोधात कायदेशीर कारवाई होण्याकरीता तक्रार आहे.

माझा नमूद जबाब संगणकावर मराठीत टंकलिखित करण्यात आलेला असून, तो मला हिंदीतून वाचुन समजावून सांगितला असता तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष
VPatil
6/7/19
( विनोद पाटील )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

इस्टइनरठौर
6-7-2019